॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

**Fax : (02462) 215572** | **Public Relations Office (PRO)** | **website: srtmun.ac.in**

**Phone: (02462) 215325** | **जनसंपर्क कार्यालय** | **E-mail: pro@srtmun.ac.in**

संदर्भ क्र.: ज.का./२०२३-२४/१४८ दि.१८/०९/२०२४

## 'स्वारातीम' विद्यापीठामध्ये 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २० सप्टेंबर रोजी सकाळी १०:०० ते सायंकाळी ०४:०० वा. दरम्यान विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहामध्ये 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती' या विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे विभागस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे.

या कार्यशाळेस अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक मा. शहाजी उमाप हे राहणार आहेत. प्रमुख उपस्थितीमध्ये नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. अभिजीत राऊत आणि नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल हे राहणार आहेत.

शासनाचे प्रसिद्ध मार्गदर्शक तत्वे आणि उक्त नमूद उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या अनुषंगाने राज्यातील विद्यापीठे, महाविद्यालये, शासकीय संस्था, मुलींच्या वस्तीगृहामधील विद्यार्थिनींना शिक्षणाबरोबरच त्यांच्या सुरक्षिततेसाठी महिला कायद्याची ओळख व्हावी या दृष्टीने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे.

सदर कार्यशाळेमध्ये विशाखा मार्गदर्शक तत्वे, कामाच्या ठिकाणी महिला लैंगिकछळ प्रतिबंध कायदा-२०१३, विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली २ मे २०१६ ची मार्गदर्शक तत्त्वे, विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांचे महिला सुरक्षा संदर्भात केलेल्या शिफारशी आणि महिला वस्तीगृहासाठी सुरक्षा व सुरक्षा उपाययोजना इत्यादी विषयावर साधन व्यक्ती मार्गदर्शन करणार आहेत. साधन व्यक्ती म्हणून नांदेड जिल्हा न्यायालयातील जिल्हाविधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश दलजितकौर जज, नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील विशेषकक्ष महिला व बालकल्याण विभागाच्या समंत्रक मा. सुचित्रा भगत आणि नांदेड जिल्ह्याच्या महिला व बालविकास बालकल्याण अधिकारी रुपाली रंगारी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. असे नांदेड उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. किरणकुमार बोंदर आणि विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे यांनी कळविले आहे.

---